
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | गुरुवार, 14 मे 2026 | अंक क्र. 351 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# सीबीआय संचालक प्रवीण सूद यांना पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ

## निवड प्रक्रियेवर राहुल गांधींचा तीव्र आक्षेप



■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

केंद्र सरकारने केंद्रीय अन्वेषण विभागाचे संचालक प्रवीण सूद यांच्या कार्यकाळात आणखी एका वर्षाची वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, प्रवीण सूद आता मे २०२७ पर्यंत सीबीआय संचालकपदावर कायम राहणार आहेत. त्यांच्या कार्यकाळाला मिळालेली ही सलग दुसरी मुदतवाढ ठरली असून, यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. केंद्र सरकारने जारी केलेल्या अधिकृत आदेशानुसार, निवड समितीच्या शिफारशीनंतर मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने २४ मे २०२६ नंतरही त्यांचा कार्यकाळ एक वर्षासाठी वाढवण्यास मंजुरी दिली आहे. प्रवीण सूद यांनी २५ मे २०२३ रोजी सीबीआय संचालकपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यांचा मूळ कार्यकाळ दोन वर्षांचा असला तरी यापूर्वीही त्यांना एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती. मंगळवारी (१२ मे) झालेल्या उच्चस्तरीय निवड समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी अध्यक्षस्थानी होते. समितीत भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचाही सहभाग होता. मात्र, या नियुक्ती प्रक्रियेवर राहुल गांधी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बैठकीनंतर त्यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावर पोस्ट करत या प्रक्रियेबाबत आपला औपचारिक आक्षेप नोंदवला असल्याचे सांगितले. तसेच, त्यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "पक्षपाती वाटणाऱ्या प्रक्रियेत सहभागी होऊन घटनात्मक कर्तव्याशी तडजोड करता येणार नाही," असे स्पष्ट मत राहुल गांधी यांनी व्यक्त केले आहे. या निर्णयामुळे सीबीआयच्या स्वायत्ततेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून, केंद्र सरकार आणि विरोधकांमध्ये नव्या राजकीय वादाला तोंड फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# परळीत मराठा समाजाचा एल्गार !

## मागणी मान्य होईपर्यंत मागे हटणार नाही सकल मराठा समाजाचा निर्धार

### 'मराठा भवन' आणि 'शिव-जिजाऊ' पुतळ्यासाठी चौथ्या दिवशीही ठिय्या सुरू



■ परळी (प्रतिनिधी)

शहरात भव्य 'मराठा भवन' उभारण्यासाठी हक्काची जागा मिळावी आणि राजमाता जिजामाता उद्यानात 'बाल शिवबासह राजमाता जिजाऊ माँ साहेबांचा' पुतळा सन्मानाने बसवला जावा, या प्रमुख मागण्यांसाठी परळी नगर परिषदेसमोर सुरू असलेल्या बेमुद्दत ठिय्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. रणरणत्या उन्हातही आंदोलकांचा उत्साह कायम असून, "मागणी मान्य झाल्याशिवाय इथून हलणार नाही," असा आक्रमक पवित्रा सकल मराठा समाजाने घेतला आहे.

सोमवार, ११ मे २०२६ पासून सकल मराठा समाजाच्या वतीने हे आंदोलन पुकारण्यात आले आहे. मागील अनेक दिवसांपासून नगर परिषद प्रशासनाकडे या संदर्भात पाठपुरावा केला जात होता. मात्र, प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने अखेर समाजाने आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे.

आंदोलनाच्या चौथ्या दिवशीही प्रशासनाकडून ठोस पावले उचलली न गेल्याने आंदोलकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. आगामी काळात प्रशासनाने यावर तोडगा न काढल्यास हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या आंदोलनाला शहरातून आणि ग्रामीण भागातूनही मोठा पाठिंबा मिळत आहे.

# काटकसर केवळ सामान्य जनतेसाठीच का ?

## राज ठाकरेंचा सरकारला थेट सवाल

■ मुंबई वृत्तसंस्था



देशात इंधन बचतीसाठी आणि काटकसरीसाठी सामान्य नागरिकांना वारंवार आवाहन केले जाते. मात्र राजकीय नेत्यांच्या भव्य प्रचारसभा, रोड-शो आणि हेलिकॉप्टरद्वारे होणाऱ्या इंधनाच्या मोठ्या वापराकडे सरकार दुर्लक्ष का करते, असा थेट सवाल मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

राज ठाकरे यांनी सामाजिक माध्यमांवर पोस्ट करत सरकारच्या धोरणांवर टीका केली. ते म्हणाले की, सामान्य नागरिकांना इंधनाचा वापर कमी करण्याचे आवाहन केले जाते, काटकसर करण्याचे सल्ले दिले जातात. मात्र दुसरीकडे निवडणुकीच्या काळात हजारो वाहनांचे ताफे, मोठमोठे रोड-शो, हेलिकॉप्टरचा वापर आणि प्रचंड प्रमाणावर होणारा इंधन खर्च याकडे कोणाचेही लक्ष जात नाही.

"काटकसर ही केवळ सामान्य जनतेसाठीच आहे का? राजकीय पक्ष आणि नेत्यांसाठी हे नियम लागू होत नाहीत का?" असा सवाल त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, निवडणूक प्रचारादरम्यान कोट्यवधी रुपयांचे पेट्रोल आणि डिझेल खर्च केले जाते. लाखो समर्थकांची ने-आण केली जाते. यामुळे मोठ्या प्रमाणावर इंधन जळते, मात्र याबाबत सरकार कोणतीही भूमिका घेत नाही. सामान्य माणसाला मात्र इंधन दरवाढीचा फटका सहन करावा लागतो.

देशात इंधन दरवाढ आणि वाढती महागाई हा गंभीर प्रश्न बनला असताना सरकारने याबाबत ठोस भूमिका स्पष्ट करावी. गरज पडल्यास संसदेत विशेष अधिवेशन बोलावून या विषयावर चर्चा करावी, अशी मागणीही राज ठाकरे यांनी केली. राज ठाकरे यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले.

# सामान्यांच्या खिशाला कात्री; सोनं-चांदी ते दूधाच्या दरात मोठी वाढ

■ नवी दिल्ली वृत्तसंस्था

गेल्या चार दिवसांत देशाच्या आर्थिक आणि वित्तीय क्षेत्रात झपाट्याने घडामोडी घडताना दिसत आहेत. पश्चिम आशियातील वाढता तणाव, इराणमधील संकट आणि जागतिक अनिश्चिततेचा थेट परिणाम आता सर्वसामान्यांच्या खिशावर होऊ लागला आहे. महागाईचा दबाव वाढत असताना शेअर बाजारातही अस्थिरतेचं वातावरण निर्माण झालं आहे. रोजच्या गरजांच्या वस्तूंपासून इंधनापर्यंत अनेक गोष्टी महागल्याने सामान्य नागरिकांचं मासिक बजेट कोलमडण्याची चिन्हं दिसत आहेत.

### ■ पंतप्रधानांचं जनतेला मोठं आवाहन

पश्चिम आशियात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे कच्च्या तेलाच्या किंमती सातत्याने वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना काही महत्त्वाची आवाहनं केली आहेत. पेट्रोलियम पदार्थांचा वापर मर्यादित ठेवावा, परकीय चलन साठा टिकवण्यासाठी सोन्याची खरेदी काही काळ टाळावी, तसेच कंपन्यांनी पुन्हा 'वर्क फ्रॉम होम' पद्धतीचा विचार करावा, असे त्यांनी म्हटले आहे. याशिवाय खतांचा वापर ५० टक्क्यांनी कमी करण्याचं आणि परदेश पर्यटनाऐवजी देशांतर्गत पर्यटनाला प्राधान्य देण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे. या वक्तव्यानंतर देशात आर्थिक मंदी, इंधन टंचाई आणि वाढत्या महागाईबाबत नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. केंद्र सरकारने सोनं आणि चांदीवरील आयात शुल्कात मोठी वाढ करत ते ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत नेलं आहे. या निर्णयाचा थेट परिणाम देशांतर्गत बाजारातील सोन्या-चांदीच्या दरांवर झाला आहे. बुधवारी अवघ्या एका दिवसात सोन्याच्या किमतींमध्ये तब्बल ९ ते ११ हजार रुपयांची वाढ झाली. त्यामुळे सोन्याचा दर प्रति तोळा पावणे दोन लाख रुपयांच्या घरात पोहोचला आहे. चांदीच्या दरातही मोठी वाढ नोंदवण्यात आली असून गुंतवणूकदारांसह ग्राहकांनाही याचा मोठा फटका बसत आहे.

### रुपयाची विक्रमी घसरण, महागाईत वाढ

■ **कच्च्या तेलाच्या वाढत्या आयात खर्चामुळे भारतीय रुपयावर मोठा दबाव निर्माण झाला आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया ९५.७० या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर घसरला आहे. दरम्यान, १२ मे रोजी जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार देशातील किरकोळ महागाई दर ३.४८ टक्क्यांवर पोहोचला आहे. तर खाद्यपदार्थांच्या महागाईचा दर ४.२० टक्क्यांपर्यंत वाढल्याने सामान्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.**

### ■ दूधही महागलं; सर्वसामान्यांवर आणखी भार

महागाईच्या झटक्यात आता दुधाचाही समावेश झाला आहे. अमूल आणि मदर डेअरी या प्रमुख दूध उत्पादक कंपन्यांनी दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपयांची वाढ जाहीर केली आहे. अमूलच्या ५०० मिली A2 म्हशीच्या दुधाची किंमत ३७ रुपयांवरून ३९ रुपये करण्यात आली आहे. तर १ लिटर अमूल गोल्ड दूधासाठी आता ग्राहकांना ६९ रुपये मोजावे लागणार असून यापूर्वी ही किंमत ६७ रुपये होती. अमूल टी स्पेशल दुधाचा दर ६३ रुपयांवरून वाढून ६६ रुपये झाला आहे. याशिवाय अमूल ताजा आणि शक्ती दूधाच्या किमतीतही वाढ करण्यात आली आहे. अमूलनंतर इतर दूध उत्पादक संघांकडूनही लवकरच दरवाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# संपादकीय

## मायेचा जिव्हाळा जपणारी गावाकडची माणसं

धावपळीच्या आयुष्यात हरवलेला माणूस जेव्हा थकून जातो, तेव्हा त्याला आठवण येते ती आपल्या गावच्या मातीची आणि तिथल्या मायेच्या सावलीची. शहर आपल्याला सोयी-सुविधा देतं, पण गाव आपल्याला 'जिव्हाळा' देते.

आजही आपल्या गावाकडच्या माणसांचा विचार केला, तर ती आजही मायेचा जिव्हाळा जपणारी आहेत, हे गावी गेल्यावरच प्रकर्षाने जाणवते. पोटापाण्याच्या आणि उदरनिर्वाहाच्या साधनांच्या अभावामुळे आपण शहरात आलो, हे वास्तव असले तरी आपले मन मात्र कायम गावाकडेच असते. शहरात राहूनही सणासुदीला ज्यांना शक्य असते, ते गावी जाऊन सण साजरा करतात आणि पुन्हा रोजीरोटीसाठी शहरात परततात. इतकेच नाही, तर मुलांची वार्षिक परीक्षा संपली की कुटुंबीयांसोबत उन्हाळ्यात दहा-पंधरा दिवस आपल्या गावी आवर्जून राहून येतात. या काळात गावच्या माणसांच्या सहवासात राहिल्यावर समजते की, ही माणसे आजही आपली परंपरा आणि निसर्गाशी नाते जपून आहेत.


गावची माणसे अत्यंत कष्टाळू असतात. भावकीत कितीही गट-तट असले तरी संकटाच्या वेळी हीच माणसे सावलीसारखी पाठीशी उभी राहतात. वरून फणसासारखी काटेरी वाटली, तरी ही माणसे आतून गऱ्यासारखी गोड असतात. ही माणसे आपल्या मातीशी प्रामाणिक असतात. आपापसात भांडणे झाली, तरी सुख-दु:खाच्या प्रसंगी ती एकत्र येतात. काबाडकष्ट करून घरी आलेल्या पाहुण्याला ती 'काय देऊ?' असे शहरातल्या लोकांसारखे विचारत नाहीत, तर घरात जे काही असेल ते आनंदाने समोर ठेवतात. घरात साखर नसली तरी मागच्या दाराने शेजाऱ्याकडून ती आणून पाहुण्याला चहा देतील, पण त्याला त्याची जाणीवही होऊ देणार नाहीत. कितीही संकटे आली तरी शहरातील नातेवाइकांना न कळवता आहे त्यात समाधान मानणारा हा गावचा माणूस आहे.

कोविड काळात या माणसांना १४ दिवस घरापासून दूर राहावे लागले, याची सल आजही त्यांच्या मनात आहे. मध्यंतरी गॅस आल्याने चुलीकडे दुर्लक्ष झाले होते, मात्र आता गॅसच्या वाढत्या किमतींमुळे पुन्हा चुलीला चांगले दिवस आले आहेत. याचे श्रेय गावच्या माणसांनाच जाते, कारण त्यांनी चुलीचे अस्तित्व टिकवून ठेवले. आजही कोकणात येणारे पर्यटक चुलीवरच्या जेवणालाच जास्त पसंती देतात.

आता चातक पक्ष्याप्रमाणे गावची माणसे चाकरमान्यांची आणि त्यांच्या मुलाबाळांची वाट पाहत आहेत. पूर्वी पत्र आल्यावर चाकरमानी येणार हे समजायचे आणि गावची मंडळी त्यांच्या स्वागतासाठी सज्ज व्हायची. घरापुढचे अंगण सारवून रांगोळ्या काढणे, वाट साफ करणे, घर नीटनेटके ठेवणे ही कामे हौसेने केली जायची. स्वतःच्या झाडाला आंबे-फणस नसले तरी शेजाऱ्या-पाजाऱ्यांकडून ते मिळवून पाहुण्यांची सोय केली जायची. गावी आल्यावर दुसऱ्याच दिवशी फणसाची सुकी भाजी (जनता भाजी) पोटभर खिलवली जाते. चाकरमान्यांनी रानावनात जाऊ नये, त्यांनी वर्षभर शहरात कष्ट केले आहेत म्हणून त्यांनी घरीच आराम करावा, असा वडिलकीचा सल्ला ही माणसे देतात. "पोरांना सांभाळा, काट्याकुट्यात पाठवू नका, बाहेरचे पाणी पिऊ नका, चुलीवर गरम केलेलेच पाणी प्या" असे प्रेमळ सल्ले तिथे मिळतात.

पुन्हा शहरात परतीच्या प्रवासाला निघताना सुकी मासळी कपड्याच्या पिशवीत बांधून द्यायला ही माणसे विसरत नाहीत. त्यासाठी गावात येणाऱ्या मासेवालीला आधीच सांगून ठेवले जाते. त्यासोबतच एखाद-दोन किलो घरचे तांदूळ न सांगता पिशवीत भरले जातात. हे सर्व केवळ मायेपोटी केले जाते. शहराच्या धकाधकीच्या जीवनापेक्षा गावच्या जीवनात नात्यांचा ओलावा जास्त असतो. शेजाऱ्याकडे पाहुणे आले तरी त्यांची विचारपूस करणारी ही माणसे आजही एकत्र कुटुंब पद्धती टिकवून आहेत.

आर्थिक परिस्थिती बेताची असली तरी 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' हे त्यांचे सूत्र असते. सार्वजनिक कामासाठी ही मंडळी मतभेद विसरून एकत्र येतात. सणादिवशी एकमेकांना गोडधोड वाटतात. ताटातले जेवण शेजाऱ्याला नेऊन देण्याची संस्कृती आजही तिथे जिवंत आहे. जेव्हा चाकरमानी पुन्हा शहरात जाण्यासाठी निघतात, तेव्हा त्यांचे सामान उचलण्यापासून त्यांना गाडीपर्यंत सोडायला जाण्यापर्यंत ही माणसे सोबत असतात. "पुढच्या वर्षी नक्की या, पोरांना सांभाळा, पोहोचल्यावर फोन करा," असे सांगताना त्यांच्या डोळ्यांत पाणी येते. कारण, ही केवळ माणसे नसून मायेचा आणि प्रेमाचा ठेवा जपणारी माणुसकीची प्रतीके आहेत. अशी ही मायेचा जिव्हाळा जपणारी गावाकडची माणसं आजही माणुसकी जिवंत ठेवून आहेत.



# अंबाजोगाई पीपल्स बँकेला मिळाला सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्कार

**■ जलद व अत्याधुनिक सेवा देवून अंबाजोगाई पीपल्स बँकेने ग्राहकांची विश्वासार्हता कमावली - चेअरमन राजकिशोर मोदी**

**■ अंबाजोगाई प्रतिनिधी**

येथील अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.अंबाजोगाई या बँकेला क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने पुणे येथे आयोजित ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकींग सम्मीट ॲण्ड अवॉर्ड - २०२६ सोहळ्यात सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्काराने नुकतेच गौरवविण्यात आले आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने नेहमीच पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर ग्राहक सेवेला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सातत्यपूर्ण उत्तम टीमवर्क करून बँकेने जलद व अत्याधुनिक सेवा देवून सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली असे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

यंदा चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेस मिळालेला पुरस्कार हा बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व शाखाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी केलेल्या उत्तम टीम वर्कचेच फलित आहे. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना एखाद्या बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत बँकींग सेवा, विविध सुविधा उपलब्ध करून देते. अंबाजोगाई पीपल्स या आपल्या बँकेने ही आपला एनपीए हा कमीत-कमी राखण्याचा, ठेवण्याचा अटोकाट प्रयत्न प्रत्येक आर्थिक वर्षांत केलेला आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेने एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले याची दखल घेत आशिया खंडातील सहकारी बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत कॉपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने मागील वर्षी मुंबई येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात भारतरत्न सहकारिता पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. सलग दुसऱ्या वर्षी अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.अंबाजोगाई या बँकेला क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने पुणे येथे आयोजित ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकींग सम्मीट ॲण्ड अवॉर्ड - २०२६ या सोहळ्यात सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. सदरचा पुरस्कार क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने आयोजित एका विशेष समारंभात बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, बँकेचे सरव्यवस्थापक गणेश अष्टपुत्रे, बँकेचे व्यवस्थापन मंडळ सदस्य संदेश बोराडे, संगणक विभागप्रमुख गणेश रोकडे यांनी स्विकारला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह असे आहे. यावेळी क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत इंडस्ट्री प्रेझेंटेशन, चर्चासत्र, सांस्कृतिक कार्यक्रम व पुरस्कार सोहळा अशी कार्यक्रमाची रूपरेषा होती. सध्याचे बँकिंग व्यवहार, डिजिटलायझेशन, सायबर क्राईमची जोखीम, काय सतर्कता बाळगावी, नवनवे तंत्रज्ञान, बँकींगसाठी आवश्यक आधुनिक सॉफ्टवेअर, मशिन्स, ॲप, नव्या सुविधा, उत्तम व दर्जेदार गुणवत्तापूर्ण ग्राहक सेवा देण्यासाठी आवश्यक बाबी या संदर्भात दोन दिवसीय कार्यशाळेच्या कोरेगाव पार्क येथील वेस्ट इन परिसरात विविध स्टॉल उभारण्यात आले होते. सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आमच्या प्रतिनिधीशी बोलताना बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी सांगितले की, अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.अंबाजोगाई या आपल्या बँकेने सुरूवातीपासून एनपीए कमीत-कमी राखला आहे. सर्वच शाखांतून बँकींग विषयक सर्व आधुनिक सेवा, सुविधा, नवे तंत्रज्ञान, डिजिटल व्यवहार बँक सभासद आणि ग्राहकांना पुरविते. यापूर्वी ही बँकेस विविध सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. बँकेने मिळविलेले आजचे हे यश दिवंगत लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख, दिवंगत लोकनेते माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, दिवंगत लोकनेते माजी आमदार बाबुरावजी आडसकर तसेच माजी कृषिमंत्री आमदार धनंजयजी मुंडे, माजी आमदार अमरसिंहजी पंडित यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, मोलाची मदत व सहकार्य लाभल्यामुळे प्राप्त झाले आहे. या सोबतच बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, ठेवीदार, कर्जदार, भागधारक, ग्राहक, हितचिंतक तसेच सभासदांच्या सातत्यपूर्ण विश्वास व सहकार्याच्या भावनेमुळेच




शक्य झाले असल्याचे देखील या पत्रकात नमूद केले आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेची एकूण सभासद संख्या १३,१५८ एवढी असून त्याच्या बळावरच बँकेच्या सभासद तथा ग्राहकांना रू. ३६९ कोटी इतके कर्जवाटप केले आहे. या आर्थिक वर्षाचे रू.२१ कोटी एवढे भाग भांडवल असून बँकेचा स्वनिधी रू.५४ कोटी एवढा आहे. त्याच बरोबर वर्ष अखेरीस बँकेने एकूण रू.३५० कोटी एवढी गुंतवणूक केली आहे. बँकेने एकूण ठेवी रू.६६५ कोटी इतक्या जमा केलेल्या आहेत. सर्व ठेवींना विमा संरक्षण आहे. गतवर्षीच्या तुलनेत तब्बल १३० कोटी रूपयांची व्यवसायात वाढ झाली आहे. स्थापनेपासून बँकेने लेखा परिक्षण वर्ग-अ कायम राखला आहे. तर अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँकेने मार्च २०२६ अखेर तब्बल १ हजार ३२ कोटींचा एकूण बँकिंग व्यवसाय केला असून शुन्य टक्के नेट एनपीए राखण्यात बँकेस यश आले आहे. तर बँकेने ५ कोटी २६ लक्ष रूपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. १९९६ साली केवळ एका शाखेद्वारे अतिशय अल्प अशा भांडवलावर सुरू झालेली अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँक आज ६६५ कोटी ठेवींच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या बीड, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, पुणे, अहिल्यानगर या जिल्ह्यांत २१ कार्यरत शाखा व २ विस्तारित कक्ष अशा एकूण २३ शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना तत्पर व दर्जेदार बँकिंग सेवा देत आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने परवानगी दिलेल्या केज, मुरूड व निलंगा या ठिकाणी बँकेच्या नवीन तीन शाखा अहवाल वर्षात कार्यरत झाल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या सर्व नियमांच्या आधीन राहूनच अंबाजोगाई पिपल्स बँक आजपर्यंत सर्व आर्थिक व्यवहार करीत आहे. म्हणूनच रिझर्व्ह बँकेने नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिल्याचे मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. अंबाजोगाई पीपल्स बँकेच्या सर्वांगिण प्रगती आणि विकासात बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, सर्व संचालक श्री.वसंतराव चव्हाण, ॲड.विष्णुपंत सोळंके, पुरूषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड.सुधाकर कराड, संकेत मोदी, शेख दगडू शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, श्रीमती वनमाला रेड्डी, सौ.स्नेहा हिवरेकर, तज्ज्ञ संचालक सुनिल राजपुरोहित, तज्ज्ञ संचालक सचिन बेंबडे, मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे, बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारीवृंद व पिग्मी एजंट यांचे सातत्यपूर्ण सहकार्य व योगदान आहे. अशी माहिती चेअरमन मोदी यांनी दिली. अंबाजोगाई पीपल्स बँकेस पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सर्वस्तरांतून बँकेचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

### जलद व अत्याधुनिक सेवा देवून अंबाजोगाई पीपल्स बँकेने विश्वासार्हता कमावली :

जलद व अत्याधुनिक सेवा देवून अंबाजोगाई पीपल्स बँकेने आपल्या ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. म्हणूनच बँक सातत्यपूर्ण सर्वंकष कामगिरी करून वेगाने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेविदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक यांच्या बँकींग गरजा पूर्ण करण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला आहे. अंबाजोगाई पीपल्स ही ग्राहकांची आपली हक्काची व त्यांचे हित जपणारी ही बँक असून बँकेस सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्कार - २०२६ हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाल्याने आंनद झाला. पुरस्कारामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. यापुढील काळात ही अंबाजोगाई पीपल्स बँक आपल्या सर्वांच्या सेवेसाठी तत्पर राहील अशी ग्वाही देतो.

**■ राजकिशोर मोदी (चेअरमन, अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक)**

## कोकणातील आंबा-काजू बागायतदारांना वाऱ्यावर सोडणार नाही! : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई** : हवामान बदल आणि अवकाळी पावसामुळे कोकणातील आंबा व काजू बागायतदारांचे अतोनात नुकसान झाले आहे. या संकटात राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, नुकसान भरपाईबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करून अंतिम तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बीढवरी दिली. मंत्रालयात बैठकीत बागायतदारांच्या शिष्टमंडळाला संबोधित करताना ते बोलत होते.

आंबा व काजू उत्पादकांच्या कर्जमुक्तीसह विविध मागण्यांसदर्भात काढण्यात येणाऱ्या मोर्चाच्या अनुषंगाने ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. कोकणातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत, महसूल मंत्र्यांनी प्रशासकीय यंत्रणेला कडक सूचना दिल्या आहेत. "कोकणातील नुकसानीचे पंचनामे तातडीने आणि अत्यंत पारदर्शक पद्धतीने पूर्ण करावेत. सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रक्रियेचा वेग वाढवून सर्वेक्षण लवकरात लवकर संपवावे," असे आदेश त्यांनी यावेळी दिले.

या बैठकीला कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले उपस्थित होते. सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, यावर महसूल मंत्र्यांनी भर दिला. सध्या जाहीर केलेली हेक्टरी २२ हजार रुपयांची मदत तुटपुंजी आहे. आंब्यासाठी हेक्टरी ५ लाख आणि काजूसाठी ३ लाख रुपये मदत मिळावी. तसेच एनडीआरएफच्या मदतीसह कर्जमाफीचा लाभ मिळावा अशी मागणी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी यावेळी केली.

**ॐ नमो जी आद्या । वेद प्रतिपाद्या ।जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥ १ ॥**

ॐकार हाच परमात्मा आहे असे कल्पून ज्ञानदेवांनी मंगल केले आहे. हे सर्वांचे मूळ असणाऱ्या व वेदांच्या प्रतिपादनाचा विषय असाणाऱ्या ॐकारा, तुला नमस्कार असो. व स्वत: स्वत:ला जाणण्यास योग्य असणाऱ्या आणि सर्वव्यापी अशा आत्मरूपी ॐकारा तुझा जयजयकार असो. ॥१-१॥






दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# नीट पेपरफुटीचा तपास सीबीआयच्या हाती : 'सायबर' इंजिनिअरसह तिघे गजाआड

**पुणे |** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'युजी नीट' (NEET UG) पेपरफुटी प्रकरणाला आता नवे वळण मिळाले असून, या घोटाळ्याचे धागेदोरे थेट पुण्यातील वाघोली आणि बिबवेवाडी भागापर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राजस्थानच्या 'एसओजी' कडून हा तपास आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) सोपवण्यात आला आहे. या रॅकेटचा मुख्य सूत्रधार धनंजय लोखंडे हा पुण्याच्या वाघोली परिसरातून हे संपूर्ण जाळे चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

पुण्यातील फुरसुंगी भागातून शेषराव सोळंकी या इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्याला ताब्यात घेण्यात आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, शेषराव सायबर सुरक्षा (Cyber Security) विषयाचे शिक्षण घेत होता. सायबर गुन्हे रोखण्याचे शिक्षण घेणारा हा विद्यार्थी लोखंडेच्या सांगण्यावरून पेपर विकत घेणारे विद्यार्थी शोधणे आणि त्यांच्याकडून पैसे गोळा करण्याचे काम करत होता.

ब्युटी पार्लरच्या आडून रॅकेट

पुण्याच्या बिबवेवाडी भागात ब्युटी पार्लर चालवणारी मनिषा वाघमारे ही गेल्या तीन वर्षांपासून लोखंडेच्या संपर्कात होती. ती गरजू विद्यार्थ्यांना शोधून त्यांना प्रश्नपत्रिका विकण्याचे काम एजंट म्हणून करत असल्याचे तपासात समोर आले आहे.

नाशिकचा 'कौन्सलर' आणि गुरुग्राम कनेक्शन

नाशिकच्या इंदिरानगरमधून शुभम मधुकर खैरनार याला पोलिसांनी अटक केली आहे. शुभम हा बीएएमएसच्या तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी असून त्याने प्रश्नपत्रिका संच हरियाणातील गुरुग्राम येथे कुरिअरद्वारे पाठवल्याचा आरोप आहे. अटकेच्या भीतीने शुभम खैरनारने चक्क टक्कल केले होते आणि तो देवदर्शनाच्या बहाण्याने पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, नाशिक पोलिसांनी केवळ दीड तासात शिताफीने त्याचा शोध घेऊन बेड्या ठोकल्या.




धनंजय लोखंडे हा वेगवेगळ्या शहरातील एजंटमार्फत प्रश्नपत्रिकांची विक्री करत होता. या प्रकरणात आतापर्यंत १६ संशयितांची नावे समोर आली असून, सीबीआयच्या चौकशीत आणखी अनेक मोठी नावे आणि आंतरराज्यीय कनेक्शन उघड होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# श्री संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर

**पुणे |** श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने वर्ष २०२६ च्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले असून, पुण्यातील मुक्कामाबाबत असलेला पेच अखेर सुटला आहे. भाविकांची वाढती संख्या आणि जागेची टंचाई यामुळे मुक्काम बदलण्याच्या हालचाली सुरू होत्या, मात्र प्रशासनाने दिलेल्या लेखी हमीनंतर यंदाही पुण्याचा मुक्काम भवानीपेठ येथील श्री पालखी विठोबा मंदिरातच होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

पुणे मुक्कामाचा वाद आणि तोडगा गेल्या काही वर्षांपासून भवानी पेठेतील जागा अपुरी पडत असल्याने मुक्काम रेसकोर्स किंवा सणस ग्राऊंडवर हलवण्याची मागणी होत होती. मात्र, पुणे महानगरपालिकेने या परिसरातील अतिक्रमणे हटवून रस्ता रुंदीकरण करण्याचे आणि मंदिरालगतच्या ३ खासगी मिळकती ताब्यात घेण्याचे आश्वासन दिले आहे. यासाठी महापालिकेने १० कोटी रुपयांची तरतूद केली असून ३१ मे २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.



■ **पुढील प्रमाणे परतीचा प्रवास**

२९ जुलैला श्रींचे चंद्रभागा स्नान, गोपाळपूर काला व श्री विठ्ठल रुक्मणी भेट , पादुकांजवळ विसावा व सोहळा परतीच्या प्रवासासाठी आळंदीकडे निघणार आहे. परतीचा प्रवास २९ जुलै वाखरी, ३० जुलै वेळापूर, ३१ जुलै नातेपुते, १ ऑगस्ट फलटण, २ ऑगस्ट पाडेगाव, ३ ऑगस्ट (श्रींचे नीरा स्नान)वाल्हे, ४ ऑगस्ट सासवड, ५ ऑगस्ट हडपसर, ६ ऑगस्ट (भवानी पेठ)पुणे, आळंदी,७ ऑगस्ट पुणे, ८ ऑगस्ट रोजी पुण्याहून आळंदी कडे पालखी सोहळा येणार आहे.

■ **पालखी सोहळ्याचे टप्पे**

प्रस्थानः बुधवार, ८ जुलै २०२६ (दुपारी ४ वाजता, आळंदी). पुणे मुक्कामः ९ आणि १० जुलै २०२६ (दोन दिवस). सासवड मुक्कामः ११ आणि १२ जुलै २०२६. जेजुरी मुक्कामः १३ जुलै २०२६. नीरा स्नानः १५ जुलै २०२६. पहिले उभे रिंगणः १७ जुलै २०२६ (चांदोबाचा लिंब). पंढरपूर आगमनः २४ जुलै २०२६ (आषाढ शुद्ध दशमी). मुख्य आषाढी एकादशीः शनिवार, २५ जुलै २०२६.

# छत्रपती संभाजी महाराज : पराक्रमाचे तेजस्वी प्रतीक

मराठ्यांच्या इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण हे अत्यंत संघर्षमय आणि आव्हानात्मक परिस्थितीत गेले. त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य उभारणीच्या कार्यात सतत व्यस्त होते, तर माता सईबाईंचे निधन संभाजी महाराज लहान असतानाच झाले. त्यामुळे त्यांचे संगोपन जिजाऊ मातांच्या संस्कारांत झाले. जिजाऊंच्या सान्निध्यात त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, शौर्य आणि न्यायप्रियता यांचे संस्कार रुजले. बालपणापासूनच संभाजी महाराज अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी आणि अभ्यासू होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. संस्कृत, फारसी, मराठी, हिंदी आणि पोर्तुगीज भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अल्पवयातच 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. यावरून त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येते.

संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिर्दीचा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले.

संभाजी महाराज हे अत्यंत पराक्रमी सेनानी होते. त्यांनी अनेक युद्धांमध्ये आपल्या नेतृत्वाचे दर्शन घडवले. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने मुघलांना वारंवार पराभूत केले. औरंगजेबासारख्या बलाढ्य सम्राटालाही संभाजी महाराजांचे सामर्थ्य जाणवले होते. त्यांनी आपल्या सैन्याला प्रेरणा देत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांच्या युद्धनीतीमध्ये वेग, गनिमी कावा आणि अचूक नियोजन यांना विशेष महत्त्व होते. मराठा सैन्याची ताकद वाढविण्यासाठी त्यांनी अनेक



उपाययोजना केल्या.

१६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेला संदेश संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यांचा त्याग करू नये, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांचे बलिदान हे भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे.

संभाजी महाराज अत्यंत विद्वान, संवेदनशील आणि कुशल शासक होते. त्यांनी राज्यकारभारात शिस्त, न्याय आणि प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी शेतकरी, सैनिक आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले.

संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. 'बुधभूषण' या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते.

संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्य टिकवून ठेवण्यात मोलाची भूमिका बजावली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे हे अत्यंत कठीण काम होते. कारण मुघल साम्राज्य त्या काळी अत्यंत बलाढ्य होते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरला होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी जवळपास नऊ वर्षे संघर्ष करत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांनी कधीही शत्रूपुढे शरणागती पत्करली नाही. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला प्रखर प्रतिकार केला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठा सरदारांनी मुघल सैन्याला हैराण केले. अखेरीस औरंगजेबाचा दक्षिणेतील मोहिमेमध्ये पराभव झाला. यामागे संभाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा आणि स्वराज्यनिष्ठा कारणीभूत होती.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आजच्या काळात स्वार्थ, भौतिकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. अशा वेळी संभाजी महाराजांचे जीवन आपल्याला राष्ट्रप्रेम, धैर्य, संघर्षशीलता आणि नीतिमूल्यांची जाणीव करून देते. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांचा सामना केला. त्यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतिहास अभ्यास शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाते. अनेक युवक संघटना आणि सामाजिक संस्था त्यांच्या विचारांचा प्रचार करतात. मात्र केवळ जयंती साजरी करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचे आणि आदर्शांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ युद्धांचा इतिहास नाही, तर तो संस्कृती रक्षणाचा इतिहास आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांचे लोक होते. त्यांनी कधीही जातीय किंवा धार्मिक द्वेषाला प्रोत्साहन दिले नाही. न्याय, समानता आणि स्वराज्य हीच त्यांची भूमिका होती.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची कणखर निर्णयक्षमता. कठीण प्रसंगांमध्ये त्यांनी धैर्याने निर्णय घेतले. युद्धभूमीवर ते स्वतः सैनिकांसोबत लढत असत. त्यामुळे सैनिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर होता. राजा असूनही त्यांनी कधीही ऐषआरामाला प्राधान्य दिले नाही. त्यांचे जीवन संघर्ष आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक होते.

संभाजी महाराजांच्या काळात मराठा आरमारालाही महत्त्व होते. सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याविरुद्ध त्यांनी समुद्री संरक्षण मजबूत करण्याचा प्रयत्न केला. किनारपट्टीवरील किल्ले आणि व्यापार यांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या. यावरून त्यांच्या प्रशासनातील दूरदृष्टी स्पष्ट होते.

संभाजी महाराजांचे जीवन हे त्यागाचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वराज्य आणि धर्मरक्षण हेच त्यांचे ध्येय होते. मृत्यू समोर असतानाही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यामुळे ते भारतीय इतिहासातील अमर वीर ठरतात.

आजच्या काळात इतिहासाचे योग्य आकलन होणे अत्यंत आवश्यक आहे. इतिहास केवळ गौरवासाठी नसतो, तर तो वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक असतो. संभाजी महाराजांचा इतिहास आपल्याला संघर्षातून उभे राहण्याची प्रेरणा देतो. त्यांनी



डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक)

संकटांना संधीमध्ये बदलले आणि स्वराज्य टिकवून ठेवले.

संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातील मूल्यांचा विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, विद्वत्ता आणि धैर्य ही मूल्ये समाजात रुजली तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आजच्या युवकांनी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी. मोबाईल आणि सामाजिक माध्यमांच्या आहारी जाण्याऐवजी इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे बलिदान भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रहित, सामाजिक एकता आणि नैतिक मूल्ये जपण्याचा संकल्प केला पाहिजे.

मराठ्यांच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणून संभाजी महाराजांचे नाव सदैव स्मरणात राहील. त्यांचे जीवन संघर्षाचे, शौर्याचे आणि अटळ निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की कोणतेही संकट मनुष्याच्या आत्मबलापुढे मोठे नसते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्यासाठी लढणे आणि राष्ट्रासाठी बलिदान देणे हेच खरे जीवनमूल्य आहे.

आजही महाराष्ट्रातील गड-किल्ले संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. प्रत्येक किल्ला त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगतो. त्यांच्या स्मृती आजही जनमानसात जिवंत आहेत. गावागावांतून त्यांच्या जयंतीनिमित्त उत्साह दिसून येतो. युवकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आकर्षण आणि आदर आहे.

संभाजी महाराजांचे विचार समाजाला एकत्र आणणारे आहेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, पण कधीही मानवतेचा त्याग केला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शौर्याबरोबरच संवेदनशीलताही होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे ते लोकाभिमुख राजा म्हणूनही ओळखले जातात.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी त्यांच्या जीवनावर आधारित अभ्यास, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य ज्ञान मिळाल्यास युवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे एका जाज्वल्य राष्ट्रभक्ताचे जीवन होते. त्यांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे मराठा साम्राज्य अधिक मजबूत झाले आणि पुढे पेशव्यांच्या काळात मराठ्यांनी दिल्लीपर्यंत झेंडा फडकवला. त्यामुळे संभाजी महाराजांचे योगदान मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शौर्य, विद्वत्ता आणि बलिदान यामुळे ते सदैव जनमानसात जिवंत राहतील. १४ मे रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा निर्धार केला पाहिजे. राष्ट्र आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली जिद्द, धैर्य आणि निष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, गुरुवार 14 मे 2026
Last page

# यवतमाळ जिल्ह्याच्या पिक विमा प्रश्नासाठी आमदार किसनराव वानखेडे यांचा पाठपुरावा; कृषिमंत्र्यांची मुंबईत भेट

**महागाव | प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी मागील काही वर्षांपासून नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश्य परिस्थिती आणि सततच्या उत्पादन घट यामुळे मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देणारी पिक विमा योजना ही अत्यंत महत्त्वाची ठरते. मात्र यंदा यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदतीच्या यादीतून वगळण्यात आल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा सुरू ठेवला आहे.

यापूर्वी मुंबई येथे मा. मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन जिल्ह्याच्या परिस्थितीची सविस्तर माहिती मांडली होती. यवतमाळ हा कृषिप्रधान जिल्हा असून येथील शेतकरी मोठ्या प्रमाणावर सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांवर अवलंबून आहेत. हवामानातील बदल, अतिवृष्टी, पावसाचा खंड आणि कीडग्रस्त परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली होती.

त्यानंतर आज मुंबई येथे राज्याचे कृषिमंत्री माननीय नामदार श्री. दत्ता मामा भरणे यांची आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी प्रत्यक्ष भेट घेतली. या भेटीदरम्यान यवतमाळ जिल्ह्याला पिक विमा मदत यादीत समाविष्ट करून तातडीने मदत जाहीर करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील हजारो शेतकरी



आर्थिक अडचणीत सापडले असून शासनाच्या मदतीची त्यांना अत्यंत गरज आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे आमदारांनी यावेळी स्पष्ट केले.

आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी कृषिमंत्र्यांसमोर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची वास्तविक परिस्थिती मांडताना अनेक गावांमध्ये पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आणून दिले. पिक विमा योजनेचा मूळ उद्देश हा नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आधार देणे हा आहे. त्यामुळे यवतमाळ जिल्ह्याला मदतीपासून वंचित ठेवणे अन्यायकारक ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी मंत्री महोदयांनी पिक विमा संदर्भातील तांत्रिक अडचणी दूर करून यवतमाळ जिल्ह्याला न्याय मिळवून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, असे अभिवचन दिले.


यावेळी शेतकऱ्यांच्या भावना आणि अपेक्षा शासनापर्यंत पोहोचवत, "माझ्या शेतकरी बांधवांना न्याय मिळालाच पाहिजे," अशी ठाम भूमिका आमदार श्री. किसनरावजी वानखेडे यांनी मांडली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आपण सदैव कटिबद्ध असून त्यांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहील, असा विश्वास त्यांनी जिल्ह्यातील जनतेला दिला.

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आता शासनाच्या निर्णयाकडे आशेने पाहत आहेत. पिक विमा मदत जाहीर झाल्यास हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून त्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. शासनाने शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशीच सर्वसामान्य शेतकरी बांधवांची अपेक्षा आहे.

# सामाजिक कार्याची दखल घेत शेख अजिमोद्दिन यांना पद्मपाणि पुरस्कार 2026" जाहीर

**आष्टी (प्रतिनिधी)**

पद्मपाणि राज्य-राष्ट्रीय समाजसेवा पुरस्कार २०२६ शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अजिमोद्दिन शेख यांना जाहीर झाला आहे. रविवार दि. १७ मे रोजी दुपारी दोन वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शेख अजिमोद्दिन यांनी समाजासाठी केलेले उल्लेखनीय कार्य, निःस्वार्थ सेवा, सामाजिक प्रश्नांवर सातत्याने घेतलेली भूमिका



तसेच सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी केलेल्या संघर्षाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

शेख अजिमोद्दिन यांनी विविध आंदोलन, उपोषण, माहिती अधिकार,निवेदने आणि जनआंदोलनांच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत.सामाजिक बांधिलकी जपत भ्रष्टाचाराविरोधातही त्यांनी सातत्याने आवाज उठवला आणि भ्रष्ट कामात कारवाही करण्यात यश मिळवले त्यांच्या या धाडसी आणि जनहिताच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तनाची नवी दिशा निर्माण होत असून, अनेक तरुणांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

यापूर्वीही विविध सामाजिक संस्थांकडून शेख यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना त्यांनी सांगितले की, "समाजासाठी केलेल्या कामाची खरी पोहचपावती ही समाजाकडून मिळणारा सन्मान असतो. मला मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी अभिमानाचा क्षण असून, यासाठी पद्मपाणि आयोजक व संपूर्ण टीमचे मी मनःपूर्वक आभार मानतो." पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अजिमोद्दिन शेख याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# विराट कोहलीचा नवा विश्वविक्रम



## गेलला मागे टाकत गाठला १४,००० धावांचा टप्पा!

जागतिक क्रिकेटचा `किंग` विराट कोहलीने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. टी-२० क्रिकेटच्या इतिहासात १४,००० धावांचा टप्पा ओलांडणारा तो जगातील पहिला भारतीय आणि एकूण तिसरा फलंदाज ठरला आहे. विशेष म्हणजे, हा टप्पा गाठताना विराटने `युनिव्हर्स बॉस` ख्रिस गेलचा विक्रम मोडीत काढत सर्वात वेगवान फलंदाज होण्याचा बहुमान मिळवला आहे.

**■ केवळ ४०९ डावांत केला भीमपराक्रम**

विराट कोहलीने हा ऐतिहासिक टप्पा गाठण्यासाठी केवळ ४०९ डाव घेतले. यापूर्वी हा विक्रम वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलच्या नावावर होता, ज्याने ४२३ डावांत १४,००० धावा पूर्ण केल्या होत्या. विराटने गेलच्या तुलनेत १४ डाव आधीच हे लक्ष्य गाठून टी-२० फॉरमॅटमधील आपली बादशाहत पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

**■ विराटची झंझावाती कामगिरी**

आयपीएल २०२६ मधील कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या (KKR) सामन्यात त्याने हे यश संपादन केले. आपल्या फलंदाजीच्या तंत्रातील अचूकता आणि फिटनेसच्या जोरावर विराटने ३७ व्या वर्षीही हा वेग राखून सर्वांना थक्क केले आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत आता ख्रिस गेल आणि शोएब मलिक यांच्यानंतर विराटचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरले गेले आहे.

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यास 19 मेपर्यंत मुदतवाढ



**बीड | प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या वतीने सन 2020-21, 2021-22 आणि 2022-23 या वर्षांकरिता देण्यात येणाऱ्या जिल्हा क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत आता 19 मे 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. प्राप्त प्रस्तावांना अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याने ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी दिली.

जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा तसेच त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाच्या जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम 2020 व 2022 नुसार हे पुरस्कार दिले जाणार आहेत. यामध्ये 01 गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, 01 पुरुष खेळाडू, 01 महिला खेळाडू आणि 01 दिव्यांग खेळाडू अशा एकूण चार पुरस्कारांचा समावेश आहे.

सन 2020-21 पुरस्कारासाठी 1 जुलै 2020 ते 30 जून 2021, सन 2021-22 पुरस्कारासाठी 1 जुलै 2021 ते 30 जून 2022 आणि सन 2022-23 पुरस्कारासाठी 1 जुलै 2022 ते 30 जून 2023 हा कालावधी ग्राह्य धरण्यात येणार आहे. खेळाडूंसाठी मागील पाच वर्षांतील तर क्रीडा मार्गदर्शकांसाठी मागील दहा वर्षांतील कामगिरीचा विचार केला जाणार आहे.

गुणवंत खेळाडू पुरस्कारासाठी अर्जदाराने संबंधित पुरस्कार वर्षासह मागील पाच वर्षांपैकी किमान दोन वर्षे जिल्ह्याचे अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असणे आवश्यक आहे. राज्य, राष्ट्रीय, शालेय व केंद्र शासन आयोजित स्पर्धांमधील उत्कृष्ट कामगिरीचा विचार करण्यात येणार असून स्पर्धांची प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहणार आहे. अर्ज संबंधित अधिकृत जिल्हा संघटनेमार्फत सिफारस करून सादर करणे आवश्यक असून अपवादात्मक परिस्थितीत वैयक्तिक अर्जही स्वीकारले जाणार आहेत.

तसेच एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, जागतिक चषक, युथ ऑलिंपिक, युथ कॉमनवेल्थ आदी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडूंना संबंधित पुरस्कार वर्षासाठी थेट जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी अर्जदाराने महाराष्ट्रात सलग दहा वर्षे क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असावे तसेच संबंधित पुरस्कार वर्षात त्यांचे वय 35 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पदकविजेते खेळाडू घडविणाऱ्या मार्गदर्शकांना अर्ज करता येणार आहे.अधिक माहितीसाठी श्री. अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्याशी 9604959678 या क्रमांकावर संपर्क साधावा.

विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे उपलब्ध असून पात्र खेळाडू व मार्गदर्शकांनी परिपूर्ण अर्ज 19 मे 2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत धानोरा खुर्द तालुका अंबाजोगाई या ग्रामपंचायतीची तालुकास्तरीय तपासणी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या तपासणीदरम्यान ग्रामपंचायतीच्या विविध विकासकामांची तसेच गावातील मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली.

तपासणी पथकाने गावातील स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी व्यवस्थापन, नाली स्वच्छता, हरित उपक्रम, सार्वजनिक सुविधा, परसबाग,व्यायाम शाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, उर्दू शाळा,शौचालय, समशानभूमी आधी ग्रामविकास योजनांची पाहणी अक्कलकोट येथून आलेले गटविकास अधिकारी यांच्या टीमने केली. तपासणीसाठी

गटविकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट श्री कवित्के,` विस्तार अधिकारी श्री. माने,श्रीपाटील, श्री. पोतदार या पथकाने धानोरा खुर्द गावाचे तालुकास्तरीय तपासणी केली . तपासणी कामी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे तालुका अध्यक्ष नितीन धुमाळ सचिव शौलेश शिंदे कृषी अधिकारी प्रवीण मोरे, गडदे, ग्रामपंचायत अधिकारी श्री निकम, मेंगले , सुनील मामडगे , प्रमोद जोगदंड, सरपंच पार्वतीबाई पोळ,सहाय्यक कृषी अधिकारी पंडित काकडे, सूर्यकांत धायगुडे, शिपाई असलम सय्यद,जमालुद्दीन सय्यद, माऊली वाघमारे यांनी सहकार्य केले

यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, पंचायत समिती अधिकारी तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावाच्या विकासासाठी ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्याचेही अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळत असून गावांच्या सर्वांगीण विकासासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

